दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (कार्यकारी संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक), नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

मुंबई || वर्ष ६ वे || अंक ४७ || गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




## शाळांपासून संसदेपर्यंत आता संपूर्ण वंदे मातरम घुमणार! केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय, सर्व ६ कडवी आता अनिवार्य

नवी दिल्ली : भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतीची ठिणगी टाकणाऱ्या वंदे मातरम या गीताचा सन्मान वाढवण्यासाठी केंद्र सरकारने एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. बंकिमचंद्र चटर्जी यांनी या गीताची रचना केल्याला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या दीडशेव्या जयंतीचे औचित्य साधून केंद्रीय गृह मंत्रालयाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी एक नवीन आदेश जारी केला आहे. यानुसार, आता सर्व अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये आणि विशेष प्रसंगी वंदे मातरम्ची मूळ सहाही कडवी गाणे अनिवार्य करण्यात आले आहे.




### ३ मिनिटे १० सेकंदांची नवी आवृत्ती

स्वातंत्र्यानंतर जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने गाण्याची धर्मनिरपेक्ष प्रतिमा जपण्यासाठी शेवटची चार कडवी वगळली होती. मात्र, गृह मंत्रालयाने आता मूळ रचनेतील सर्व सहा कडव्यांचा समावेश करून नवीन अधिकृत आवृत्ती तयार केली आहे. या संपूर्ण गीताच्या गायनाचा कालावधी ३ मिनिटे १० सेकंद इतका निश्चित करण्यात आला असून, त्याचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

### शाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नवीन नियमावली

केंद्र सरकारने वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला असून, आता देशातील सर्व शाळांमध्ये सकाळच्या परिपाठात या गीताचे समूह गायन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. केवळ शाळाच नव्हे, तर ज्या ज्या सांस्कृतिक सोहळ्यांमध्ये राष्ट्रध्वज फडकवला जातो, त्या सर्व ठिकाणी या गीताचे गायन करणे आता आवश्यक असेल. यामुळे विद्यार्थी आणि नागरिक स्तरावर राष्ट्रीय अस्मिता अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

### सादरीकरणाचा शिष्टाचार आणि तांत्रिक नियम

राष्ट्रीय गीताच्या सादरीकरणात एकसूत्रता आणण्यासाठी गृह मंत्रालयाने काही तांत्रिक नियमही निश्चित केले आहेत. यानुसार, गीत सुरू होण्यापूर्वी मृदंग किंवा ट्रम्पेट (कर्णा) यांसारख्या पारंपरिक वाद्यांच्या गजरात ड्रमरोल वाजवून सन्मानपूर्वक सुरुवात केली जाईल. तसेच, संचलन किंवा मार्चिंग ड्रिल सुरू असताना, जवानांनी किंवा विद्यार्थ्यांनी सात पावले चालल्यानंतरच गीताला सुरुवात करावी, असा नवा नियम करण्यात आला आहे. या सूक्ष्म नियमांमुळे वंदे मातरम्च्या गायनाला एक शिस्तबद्ध आणि भव्य स्वरूप प्राप्त होणार आहे.

### राष्ट्रपती आणि राज्यपालांच्या उपस्थितीत विशेष राजशिष्टाचार

अधिकृत राज्य कार्यक्रमांमध्ये राष्ट्रपती, राज्यपाल किंवा नायब राज्यपाल यांच्या आगमनावेळी आणि ते निरोप घेताना वंदे मातरम् वाजवले जाईल. तसेच, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर राष्ट्रपतींचे देशाला उद्देशून होणारे भाषण सुरू होण्यापूर्वी आणि संपल्यानंतर हे गीत वाजवणे आता बंधनकारक असेल. मंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या अनौपचारिक कार्यक्रमांतही या गीताचे सामूहिक सादरीकरण होऊ शकते.

### उभे राहण्याचे नियम आणि चित्रपटगृहांना सवलत

राष्ट्रीय गीत वाजवले जात असताना उपस्थितांनी सावधान () स्थितीत उभे राहून आदर व्यक्त करणे आवश्यक आहे. तथापि, चित्रपटगृहांमध्ये चित्रपट किंवा न्यूज रीलचा भाग म्हणून हे गीत आल्यास प्रेक्षकांना उभे राहणे अनिवार्य नसेल. चित्रपट पाहताना उभे राहिल्याने शांततेचा भंग होऊ शकतो आणि इतरांच्या दर्शनात अडथळा येऊ शकतो, हा विचार करून ही विशेष सवलत देण्यात आली आहे.

## अभिमानस्पद! देशाला मिळाल्या पहिल्या दृष्टिहीन महिला न्यायाधीश

नवी दिल्ली : देशाला लवकरच पहिल्या महिला दृष्टिहीन न्यायाधीश मिळणार आहेत. ही देशासाठी अभिमानस्पद गोष्ट आहे. केरळच्या दृष्टिहीन वकील तान्या नाथन सी. लवकरच राज्यातील पहिल्या दृष्टिहीन महिला न्यायाधीश होणार आहेत.

केरळच्या सिव्हिल जज (ज्युनियर डिव्हिजन) पदांसाठी नुकत्याच पार पडलेल्या परीक्षेत त्यांनी दिव्यांग श्रेणीतील गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकावला आहे. २४ वर्षीय तान्या या कन्नूर विद्यापीठाच्या लॉ ग्रॅज्युएट असून त्यांनी एलएलबी परीक्षेतही प्रथम क्रमांक मिळवला होता.





जन्मजात अंधत्व असूनही तान्या यांनी ब्रेल लिपी, स्क्रीन रीडिंग तंत्रज्ञान आणि अढळ संकल्पाच्या जोरावर आपलं शिक्षण पूर्ण केलं. त्यांचं हे यश केवळ वैयक्तिक मेहनतीचे उदाहरण नसून न्यायक्षेत्रातील सर्वसमावेशकतेचं प्रतीक ठरत आहे.

### कोण आहेत तान्या नाथन सी ?

न्यायाधीश होण्यापूर्वी तान्या कंजूर जिल्ह्यातील तातिपरम्बा येथे एक पॅक्टिसिंग वकील ( ) म्हणून कार्यरत होत्या. अवघ्या २४ वर्षांच्या वयात त्यांनी हे यश मिळवून संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. तान्या जन्मजात दृष्टिहीन असून त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण धर्मा होम या विशेष शाळेत घेतले. पुढे पारासिनीक्कडवू उच्च माध्यमिक शाळेतून दहावी आणि मोराझा सरकारी उच्च माध्यमिक शाळेतून बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली. बारावीनंतर त्यांनी कायदाचे शिक्षण घेण्याचा निर्णय घेतता, कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्यामुळे त्यांनी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केली आणि कन्जूर विद्यापीठातील एलएलबी अभ्यासक्रमात अव्वत स्थान मिळवले. त्या संस्थेतील त्या एकमेव दृष्टिहीन विद्यार्थिनी होत्या, तान्या नाथन यांचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यशाचा नसून, तो दिव्यांग व्यक्तींच्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचा आणि समावेशक न्यायव्यवस्थेचा सशक्त संदेश देणारा ठरत आहे.

यापूर्वी, २०१३ साली राजस्थानचे ब्रह्मानंद शर्मा हे भारतातील पहिले दृष्टीहिन न्यायाधीश ठरते होते. तर जागतिक स्तरावर सर जॉन अपनी वॉल पांना जगातील पहिले १०० टक्के नेत्रहिन न्यायाधीश मानले जातात.

## देशातील पहिल्या ‘मुंबई क्लायमेट वीक’चे १७ ते १९ फेब्रुवारी रोजी मुंबईत आयोजन

मुंबई, : हवामान बदलाच्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर भारतातील पहिला मुंबई क्लायमेट वीक (एमसीडब्ल्यू) १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुंबईत आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान विषयक नेतृत्वाचे नवे व्यासपीठ उभारले जाणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या क्लायमेट वीकच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील विविध देशांतील शासनप्रमुख, उद्योग क्षेत्रातील प्रमुख, हवामान तज्ज्ञ, विविध संस्था, युवक आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी एकत्र येणार आहेत.हा उपक्रम ‘प्रोजेक्ट मुंबई’ या स्वयंसेवी संस्थेने आयोजित केला असून, महाराष्ट्र शासन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, ‘एमएमआरडीए’ आणि मुंबई महापालिका सहकार्य करणार आहे.जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे या क्लायमेट वीकचे मुख्य केंद्र (हब) उभारण्यात येणार असून, शहरभर महाविद्यालये, समुदाय व सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रमांची ‘हब-अँड-स्पोक’ पद्धतीने आखणी करण्यात आली आहे. हवामानाशी निगडित प्रत्यक्ष उपाययोजना प्रदर्शित व विस्तार करण्यावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती या उपक्रमाचे आयोजक प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी दिली.

या उपक्रमाविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ‘‘मुंबई क्लायमेट वीक भारताची हवामान विषयक कृतीशील भूमिका अधोरेखित करतो. शासन, उद्योग, वित्त, तज्ज्ञ आणि युवक यांना एकत्र आणून महाराष्ट्र स्वच्छ, सुरक्षित व शाश्वत भविष्य घडवण्यासाठी सज्ज असल्याचा स्पष्ट संदेश याद्वारे जाईल.’’

प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी म्हणाले, ‘‘मुंबईची जिद्द आणि कल्पकता हवामान संकटांसमोर ठामपणे उभी राहील. नागरिकांच्या सहभागातून उभा राहणारा हा भारतातील पहिला व्यापक हवामान चळवळीचा प्रयोग ठरणार आहे.’’

### विविध परिसंवाद, इनोव्हेशन चॅलेंज, युवक हरित नवकल्पना स्पर्धा

मुंबई क्लायमेट वीकच्या मुख्य हबमध्ये नेतृत्व संवाद, विविध परिसंवाद, इनोव्हेशन चॅलेंज, युवक हरित नवकल्पना स्पर्धा आणि उपाययोजना प्रदर्शन भरवले जाणार आहे. पहिल्या दिवशी प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतील अर्थशॉट प्राईज सादरीकरणाचा विशेष कार्यक्रम होणार असून, निसर्ग, अन्नप्रणाली व लोककेंद्रित उपायांवर भर असेल. या उपक्रमात अंतराळवीर राकेश शर्मा आणि शुभांशु शुक्ला विद्यार्थ्यांशी संवाद साधून विज्ञान, अवकाश आणि हवामान जबाबदारी यावर मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाची मांडणी अन्नप्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी शाश्वतता या तीन स्तंभांवर आधारित आहे. नवकल्पनांना चालना देण्यासाठी ‘एनएसई’च्या सहकार्याने इनोव्हेशन चॅलेंज आयोजित करण्यात आले असून अंतिम फेरीत निवडलेल्या कल्पनांना धोरणकर्ते व गुंतवणूकदारांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.मुंबई शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक व्याख्याने, चित्रपट प्रदर्शन, कला-संस्कृती कार्यक्रम आणि नागरिक कार्यशाळांद्वारे हवामान कृती लोकाभिमुख करण्यात येणार आहे. प्रदर्शन क्षेत्रात स्टार्टअप, उद्योग, विद्यापीठे आणि स्वयंसेवी संस्था प्रत्यक्ष उपाययोजना मांडतील, असे आयोजकांनी कळविले आहे.

## इंटरसिटी स्मार्टबसकडून पुणे-नागपूर मार्गावर भारतातील पहिली प्युरीफाईड एअर बससेवा सुरू

पुणे, : भारतातील आघाडीच्या इंटरसिटी मोबिलिटी ब्रँड असलेल्या इंटरसिटी स्मार्टबसने आज पुणे-नागपूर आणि नागपूर-पुणे मार्गांवर इंटरसिटी स्मार्टबस.एक्यूआय सुरू करण्याची घोषणा केली. त्यामुळे या प्रदेशातील प्रवाशांसाठी भारतातील पहिली शुद्ध हवा देणारी बससेवा उपलब्ध झाली आहे.




पुणे-नागपूर मार्गावरील स्मार्टबस.एक्यूआय सेवेला पुण्यात औपचारिकरित्या आरटीओ पुणे येथील मोटार वाहन निरीक्षक. श्रीपाद भागवत यांच्या सन्माननीय उपस्थितीत झेंडा दाखवण्यात आला. त्यावेळी इंटरसिटी स्मार्टबस चे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व मान्यवर ही यावेळी उपस्थित होते. दोन शहरांमधील बस प्रवासात आरोग्य, सुरक्षितता आणि आरामदायी दर्जा वाढवण्याच्या कंपनीच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा हा सोहळा इंटरसिटीच्या स्वच्छ-हवेचा प्रवास उपक्रमातील मैलाचा दगड ठरला आहे.

इंटरसिटी स्मार्टबसचे सह-संस्थापक आणि सीईओ मनीष राठी म्हणाले, ‘‘पुणे हे आंतरशहर प्रवासाचे एक महत्त्वाचे केंद्र असून पुणे - नागपूरसारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांना येथे मोठी मागणी आहे. स्मार्टबस.एक्यूआयच्या माध्यमातून आम्ही बसमधील हवेची गुणवत्ता या प्रवासाच्या एका दुर्लक्षित पैलूवर लक्ष केंद्रित करत आहोत. प्रवाशांना श्वासावाटे स्वच्छ, सुरक्षित हवा घेत घेताना लांब अंतराचा प्रवास करता येईल याची सुनिश्चिती करणे, हे आमचे ध्येय आहे.’’

दोन शहरांदरम्यान प्रवासाच्या मार्गांवर केबिनमधील वायू प्रदूषण जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) केलेल्या मर्यादेपेक्षा २ ते ३ पट जास्त असू शकते, असे इंटरसिटीने केलेल्या अंतर्गत पाहणीत आढळून आले आहे. यावर मार्ग काढण्यासाठी कंपनीने स्मार्टबस.एक्यूआयला सतत हवा शुद्धीकरण आणि देखरेख प्रणालींनी सुसज्ज करण्यासाठी रिस्पायरर लिव्हिंग सायन्सेस या पुरस्कारविजेत्या हवामान तंत्रज्ञान कंपनीशी भागीदारी केली आहे. या अंतर्गत पायलट प्रयोगात प्रवासाच्या ९० टक्क्यांपेक्षा जास्त काळ पीएम २.५ ची पातळी सुमारे ४० / वर राखण्यात आली. प्रमुख भारतीय शहरांमध्ये असलेल्या बाहेरील हवेच्या सामान्य पातळीपेक्षा ही लक्षणीयरीत्या स्वच्छ पातळी आहे.

## शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात ‘एआयएफ’ संस्था महाराष्ट्र शासनासोबत काम करण्यास उत्सुक

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांत परिवर्तनासह कौशल्य विकासासाठी ‘अमेरिकन इंडिया फाऊंडेशन’ (एआयएफ) आणि महाराष्ट्र शासन संयुक्तपणे काम करणार आहे. ‘एआयएफ’चे संचालक कामेश संघी यांनी नुकतीच महाराष्ट्र राज्याचे नवी दिल्लीतील निवासी गुंतवणूक आयुक्त सुशील गायकवाड यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

गेल्या २५ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेली अमेरिकन इंडिया फाऊंडेशन ही संस्था शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार महाराष्ट्रात विविध प्रकल्प राबवण्यास उत्सुक आहे. या भागीदारीमुळे विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षण आणि आरोग्य सुविधांना नवी गती मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच कौशल्य विकासासाठीही विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. एआयएफने महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक प्राधान्य क्रमांनुसार संयुक्तपणे काम करण्याची तयारी दर्शविली आहे. महाराष्ट्रातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था बळकट करणे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारणे आणि तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी कौशल्य विकास प्रकल्प राबवणे यावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

गेल्या अडीच दशकांपासून भारतातील विविध राज्यांमध्ये कार्य करण्याचा अनुभव ‘एआयएफ’कडे आहे. या अनुभवाचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महाराष्ट्रात शाश्वत विकासाचे मॉडेल उभे

संपादकीय

## विकास महामंडळ

सध्या मध्य आणि पश्चिम रेल्वेवर सुमारे ३,२०० हून अधिक लोकल धावतात. प्रवाशांना गर्दीमुक्त आणि अद्ययावत प्रवास सुविधा देण्यासाठी २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहेत. या नवीन वातानुकूलित लोकलमध्ये आरामदायी आसन व्यवस्था, आधुनिक रचना, ऑक्सिजन नियंत्रक व्यवस्था या करण्यात येणार आहेत. तसेच मुंबई महानगरातील रेल्वे प्रवाशांसाठी १६ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. हे प्रकल्प टप्प्याटप्प्याने केले जात आहेत, मेट्रोच्या धर्तीवर नव्या रचनेची लोकल तयार केली जाणार आहे. लोकलमध्ये ऑक्सिजन नियंत्रक प्रणाली सुरू करून, प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल. गर्दी, उष्णता आणि प्रवासातील त्रास कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळ (एमआरव्हीसी) आणि भारतीय रेल्वे यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबवण्यात येणार असून, टप्प्याटप्प्याने या लोकल सेवेत येतील. वातानुकूलित लोकलमुळे खासगी वाहनांचा वापर कमी होऊन पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळेल. मुंबई लोकल ही मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाते. २३८ वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास मुंबईकरांसाठी दिलासादायक ठरणार आहे. तसेच प्रवाशांचा दर्जा उंचावणार. नवीन वातानुकूलित लोकल चालवण्यास सुरुवात केल्यास एकूण प्रवाशांच्या ६० टक्के प्रवाशांचा प्रवास सुखर होण्याची अपेक्षा आहे. उपनगरीय लोकलमधून दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्यासाठी रेल्वे आणि एमआरव्हीसीमार्फत अनेक प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

मुंबई उपनगरीय रेल्वेवर मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्प (एमयूटीपी)अंतर्गत विविध पायाभूत सेवा-सुविधा निर्माण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने १९९९ मध्ये मुंबई रेल्वे विकास महामंडळाची (एमआरव्हीसी) स्थापना केली. नवीन लोकल, रेल्वे मार्ग उभारणे, रेल्वे स्थानकांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एमआरव्हीसीवर सोपविण्यात आली. यासाठी केंद्र सरकार ५० टक्के आणि राज्य सरकार ५० टक्के निधी उपलब्ध करून देत आहे. या निधीतून पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागात विविध कामे पूर्ण करण्यात आली, तर काही कामे प्रगतिपथावर आहेत. एमआरव्हीसीने हाती घेतलेले प्रकल्प राबविण्यात अनेक अडचणी येत असल्याने ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात अडथळे येत आहे. यामुळे प्रवाशांना जीव धोक्यात घालून लोकलमधून प्रवास करावा लागतो. स्थापनेनंतर मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुखकर करण्यासाठी एमआरव्हीसीने एमयूटीपी १ योजना तयार केली. या योजनेत नवीन लोकल, नवीन मार्गिका, रेल्वे रुळाशेजारी बॅरिकेट लावणे असे विविध प्रस्ताव तयार केले. एमयूटीपी १ टप्प्याला २००३-०४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली.

या टप्प्यात कुर्ला-ठाणे पाचवी-सहावी मार्गिका, बोरिवली-विरार तिसरी आणि चौथी मार्गिका, ९ डब्याच्या १०१ नवीन लोकल, प्रकल्पात बाधित होणाऱ्या १५ हजार ८५७ नागरिकांचे पुनर्वसन, पश्चिम-मध्य रेल्वे मार्गावर १२ डब्यांच्या लोकल सुरू करण्यात आल्या. एमयूटीपीचा पहिला टप्पा मार्च २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आला. यामुळे रेल्वेची प्रवासी वाहतूक क्षमता ३६ टक्क्यांनी वाढली. हे प्रकल्प मार्गी लागतानाच एमआरव्हीसीच्या एमयूटीपी २ टप्प्याला २००८-९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पातील योजनांसाठी ८ हजार ८७ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. या टप्प्यातील मुंबई सेंट्रल-बोरिवली सहावी मार्गिका, सीएसएमटी कुर्ला दरम्यानच्या पाचवी-सहावी मार्गिकेचे काम प्रगतिपथावर आहे. तर ठाणे-दिवा पाचवी-सहावी मार्गिका आणि अंधेरी ते गोरेगाव दरम्यान हार्बर मार्ग विस्तार करण्याचे काम पूर्ण झाले. ऐरोली-कळवा उन्नत मार्ग २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. विरार-डहाणू रोड मार्गिकेचे चौपदरीकरणाचे काम २०२२-२३ मध्ये पूर्ण होणार होते. मात्र ही कामे सध्या प्रगतिपथावर आहेत.एमयूटीपी ३ ए टप्प्यात हार्बर मार्गिकेचा विस्तार गोरेगाव बोरिवलीपर्यंत करण्यात येणार आहे. बोरिवली-विरार दरम्यान पाचवी-सहावी मार्गिका, कल्याण-आसनगाव दरम्यान चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर दरम्यान तिसरी आणि चौथी मार्गिका, तर लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलसाठी कल्याण यार्डची कामे प्रगतिपथावर आहेत. तसेच १९१ वातानुकूलित रेक उपनगरीय रेल्वेच्या ताफ्यात येणार आहेत.

या सर्व कामांसाठी तब्बल ३३ हजार ६९० रुपये खर्च अपेक्षित आहे

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत प्रस्थापितांना धोबीपछाड; दिग्गज नेते मंडळींची मक्तेदारी संपुष्टात!

सहसंपादक-: नारायण म्हात्रे

नुकत्याच ७ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत सर्व सामान्य मतदार राजांनी प्रस्थापितांना धोबीपछाड देत विकास करणा-या उमेदवारांना निवडून दिले आहे. या निवडणुकीत मतदारांनी जोरदार धक्का देत राज्य सभेचे खासदार व भाजपा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निलिमा यांचा सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा गटात शर्मिला बोडके यांनी पराभव केला. भाजपमध्ये प्रवेश केलेले माजी आमदार पंडित पाटील यांचे पुत्र सुप्रभात पाटील यांचा शहापूर जिल्हा परिषद गटात पराभव झाला. भाजपचे आमदार ज्येष्ठ नेते रविंद्र पाटील यांची सून शर्मिला पाटील या पेण तालुक्यातील शिहु या गटातून निवडणूक लढवत होत्या त्यांचा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उमेदवार पल्लवी भोईर यांनी पराभव करत एक अनोखा विजय मिळवला. शेकाप नेत्या माजी मंत्री मिनाक्षी पाटील यांचे पुत्र व जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील व सून व जिल्हा परिषद माजी अर्थ व बांधकाम सभापती चित्रा पाटील या शेकाप सोडून भाजपच्या तिकिटावर लढत होत्या त्यांचा पराभव शिवसेना (शिंदे) गटाच्या रसिका केणी यांनी केला आहे तसेच नागोठणे जिल्हा परिषद गणातून नुकतेच शिवसेनेला जय महाराष्ट्र करून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झालेले किशोर जैन यांचा पराभव शिवसेना (शिंदे) गटाचे सुमित काते यांनी केला तसेच जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती राजीव साबळे यांना निजामपूर जिल्हा परिषद गणातून अविनाश नलावडे यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. वेणगाव पंचायत समिती गटातून शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या सून श्वेता थोरवे यांचा सुद्धा पराभव झाला आहे. एकंदरीत या झालेल्या निवडणुकीत आपणच आपले समजणा-या नेते मंडळींना मतदारांनी आपली जागा दाखविल्याचे चित्र अखंड रायगड जिल्ह्यात दिसून आले. रायगड जिल्ह्यात शिवसेना (शिंदे) गट २१ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला असून त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस १६, भारतीय जनता पक्ष १५, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ५ तर आय काँग्रेसला २ जागेवर समाधान मानावे लागले आहे. एकंदरीत हा निकाल प्रस्थापितांना धक्का देवून गेला असून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांच्या नेते मंडळींना चाचपडत चालावे लागणार हे निश्चित तसेच पक्षीय बलाबल पाहता शिवतीर्थावर कोणाची सत्ता येईल व कोण कशी जमवाजमव करील हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



# श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आंबवणे बुद्रुक यांच्यावतीने बोरीवले येथे आयोजित स्पर्धेस उत्तम प्रतिसाद

मंडणगड प्रतिनिधी दि. ११- श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (रजि.) आंबवणे बुद्रुक यांच्यावतीने आयोजित श्री गणेश मंदिर आंबवणे क्रिकेट संघ यांच्या नियोजनाने व क्रिके प्रेमी विनायक कावणकर यांच्या पुढाकाराने संघाचे कर्णधार धर्मेश चोरगे, उपकर्णधार समर कावणकर आणि संघाच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने मुंबईत बोरिवली येथे ८ फेब्रुवारी २०२६ रोजी ''युट्युब लाईव्ह क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आणि मंडळाचे माजी अध्यक्ष रमेश भुवड यांच्या हस्ते स्पर्धेचं उद्घाटन करण्यात आले. स्पर्धेसाठी गावातील माजी क्रिकेटपटू कमिटी सदस्य, वरिष्ठ सभासद मंडळी तसेच मंडणगड तालुक्यातील तरुणांनी मोलाचे सहकार्य करून स्पर्धा व्यवस्थित आणि वेळेत पार पडली. गावातील अनेक क्रिकेट प्रेमी आणि प्रतिष्ठित नागरिकांनी आपला वेळ काढून स्पर्धेची शोभा वाढवली. या स्पर्धेसाठी तालुक्यातील प्रसिद्ध समालोचक राजेश कुळे आणि त्यांचे सहकारी यांचे मार्गदर्शन आणि मोलाचे सहकार्य लाभलं यांच्या समालोचनाने स्पर्धा अजून रंगत झाली. स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्यात बक्षीस वितरण समारंभात गावातील बहुतांश लोक उपस्थित होते त्यामध्ये विशेषतः समाजसेवक विजय घरटकर, मंडळाचे माजी अध्यक्ष रमेश भुवड, मनोहर घरटकर, उपखजिदार यशवंत रहाटवळ, माजी उपाध्यक्ष रमेश शिगवण, क्रिकेटरसिक श्याम चोरगे, अजित बोथरे, समिर खेरटकर, महेंद्र शिगवण, दिपक शिगवण, स्वप्नेश भुवड, राजेश शिगवण, नितेश धामणे, नारायण बांद्रे आणि श्री गणेश मंदिर आंबवणे क्रिकेट संघ सदस्य उपस्थित होते. या स्पर्धेत लाटवण गावच्या संघाने उत्तम कामगिरी करून प्रथम पारितोषिक पटकावले शेनाळे बोलाडेवाडी संघाने व्दितीय, तर कोन्हवली संघाने तृतीय क्रमांक यजमान आंबवणे संघाने चतुर्थ क्रमांक क्रमांक मिळवीला. तेजस करावडे कोन्हवली याने उत्कृष्ट फलंदाज निकेश बोलाडे शेनाळे याने उत्कृष्ट गोलंदाज तर कल्पेश लाड याने स्पर्धेचे मालिकावीर पारितोषीक मिळवीले. प्रकारे संपूर्ण स्पर्धा शांतता, शिस्तबद्ध पद्धतीने आणि योग्य वेळेत पार पडली. युवा क्रिकेट कमिटी अंतर्गत स्पर्धेत सहभागी तालुक्यातील एकूण १६ सहभागी संघ आणि स्पर्धेसाठी लाभलेल्या देणगीदारांचे मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.



ङ्गफोटो ओळी- ङ्गविजत्या संघाचा गौरव करताना स्पर्धेस उपस्थित मान्यवर

# रायगडमध्ये १४ फेब्रुवारीला शासकीय योजनांचा महामेळावा व विधी सेवा शिबिर; एकाच छताखाली सर्व सेवा उपलब्ध

अलिबाग प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत १४ फेब्रुवारी २०२६ रोजी अलिबाग येथील कुरूळ परिसरातील आरसीएफ हॉल येथे भव्य 'विधी सेवा शिबिर व विविध शासकीय योजनांचा महामेळावा' आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.ङ्गया महामेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे




आणि त्यांना योजनांचा थेट लाभ मिळवून देणे हे आहे. जिल्हा प्रशासन, जिल्हा न्यायालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडणार असून, कार्यक्रमात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलिस अधीक्षक आँचल दलाल आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.ङ्गमहामेळाव्यात विविध शासकीय विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. आरोग्य, शिक्षण, कृषी, समाजकल्याण, महिला व बालविकास, मत्स्यव्यवसाय, आदिवासी विकास, प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ), तसेच एसटी महामंडळ आदी विभागांमार्फत योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, केवळ माहितीपुरते न राहता पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जागीच भरून घेण्याची आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.ङ्गजिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला देण्यात येणार असून, विविध कायदेशीर हक्क, सरकारी योजना, तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय, निवडक लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात योजनांच्या लाभांचे वाटपही करण्यात येणार आहे.ङ्गया कार्यक्रमात निवडणूक विभागाचाही स्टॉल असणार असून, नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीत दुरुस्ती तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत जनजागृती केली जाणार आहे. त्यामुळे युवक व नवमतदारांसाठी ही संधी उपयुक्त ठरणार आहे.ङ्गपत्रकार परिषदेत अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. प्रसाद पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा प्रशासनातील सर्व विभागांनी एकत्र येऊन नागरिकांच्या दारी शासनाच्या योजना पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.ङ्गप्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील गरजू जनतेला, या महामेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा तसेच मोफत विधी सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# गोरेगाव पश्चिम येथे माता रमाई जयंती उत्साहात साजरी

आबलोली (संदेश कदम)

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी, त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती नुकतीच बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ४३४ (मुंबई), भिमाई महिला मंडळ आणि धम्मदीप तरुण मंडळ यांच्या विद्यमाने आंध्र प्रजा संघ हॉल, न्यू हनुमान नगर रहिवासी संघ, गोरेगाव (प.) येथे साजरी करण्यात आली.ङकार्यक्रमाच्या सुरुवातीला धम्मवंदना व त्रिशरण गाथा घेण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माता रमाई आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.ङयावेळी विचारमंचावर भिमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा संगीता धोत्रे, 'वृत्त दिनांक'च्या पत्रकार मेघना सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद दिनेश लोखंडे यांनी भूषविले. प्रमुख वक्ते ॲड. विशाल वळंजू यांनी माता रमाई यांचा जीवनप्रवास आपल्या भाषणातून प्रभावीपणे मांडला. तसेच महिला मंडळातील महिलांनीही माता रमाई यांच्याविषयी आपले विचार व्यक्त केले.ङया कार्यक्रमास शाखेतील अनिल हळदे, रविंद्र गमरे, चंद्रमणी मोहिते, चंद्रकांत गायकवाड, मंगेश जाधव तसेच महिला मंडळातील भक्ती जाधव, मानिषा लोखंडे, रोशनी गमरे, सुप्रिया कदम, पद्ममिनी सूर्यवंशी, वंदना गायकवाड, पौर्णिमा सदाम्हस्के आदींसह शाखेतील सभासद, पदाधिकारी, सल्लागार आणि स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखेचे कार्यकर्ते व भिमाई महिला मंडळाच्या कार्यकारिणीने विशेष मेहनत घेतली. यावेळी उपस्थित शाखेतील सदस्य व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शेवटी सर्वांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या एकजुटीने आवरे शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात; रॉयल इलेव्हन कडून विद्यार्थ्यांचा गौरव

आबलोली (संदेश कदम)

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवरे येथे २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन आणि वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या दिमाखात पार पडले. या कार्यक्रमात शाळेचे माजी विद्यार्थी असलेल्या रॉयल इलेव्हन क्रिकेट संघ आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाची रंगत द्विगुणित झाली.ङङग्रामस्थांची भक्कम साथङकार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच आवरे गावातील ग्रामस्थांनी आपलेपणाने या सोहळ्यात सहभाग नोंदवला. शाळेच्या प्रगतीसाठी आणि मुलांच्या कौतुकासाठी ग्रामस्थांनी केवळ उपस्थितीच लावली नाही, तर नियोजनातही मोलाची मदत केली. पालकांच्या आणि ग्रामस्थांच्या मोठ्या संख्येने झालेल्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.ङरॉयल इलेव्हन कडून कौतुकाची थापङया शाळेचे माजी विद्यार्थी असलेल्या रॉयल इलेव्हन क्रिकेट संघ यांने आपल्या मातृभूमीशी असलेले नाते जपत कार्यक्रमाला बहुमोल सहकार्य केले. संघाच्या सदस्यांनी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिकरित्या पारितोषिक देऊन सन्मानित केले. माजी विद्यार्थ्यांकडून मिळणारे हे प्रोत्साहन लहान मुलांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.ङसांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानीङविद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोवाडे, लोकनृत्य आणि देशभक्तीपर गीतांना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. आपल्या मुलांमधील कलागुण पाहून पालक आणि ग्रामस्थ भारावून गेले होते.ङ''शाळा ही गावाची अस्मिता आहे. आज आमचे माजी विद्यार्थी रॉयल इलेव्हनच्या माध्यमातून शाळेसाठी धावून आले आणि ग्रामस्थांनी जी साथ दिली, त्याबद्दल आम्ही ऋणी आहोत,'' असे भावूक उद्गार मुख्याध्यापकांनी काढले.ङया सोहळ्यामुळे आवरे गावातील शाळा, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांच्यातील अतूट नाते पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.या कार्यक्रमासाठी श्री.प्रकाश कातळकर (सरपंच)श्री.रामचंद्र गुरव, श्री.यशवंत शितप (तंटामुक्त अध्यक्ष),श्री.सखाराम गुरव,श्री.गणपत शितप,श्री.अशोक जाधव, श्री.चंद्रकांत जाधव, श्री.कृष्णा खळे ,श्री. प्रकाश गोताड,श्री.विशाल गोताड,तसेच श्री.सुनील भरणकर(शाळा व्यवस्थापन समितीअध्यक्ष) श्री.संदेश भरणकर,(ग्राम.समिती.सदस्य) श्री.संदीप भरणकर (शिक्षणतज्ञ) या सर्वांचे सहकार्य लाभले.कार्यक्रम बसविण्यासाठी आशिष शितप आणि योगेश शितप यांनीही सहकार्य केले तसेच सर्व माता पालक,ग्रामस्थ माजी विद्यार्थी यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ संध्या दिनेश नेटके उपशिक्षिका सौ संस्कृती वैभव ढवळ यांनी सर्वांचे आभार मानले



# लोकजागर

१ लोक सेवार्थ

भटक्या प्राण्यांसाठीचे प्राणी कल्याण मंडळ

ज्येष्ठ नृत्यांगना रुक्मिणीदेवी अरुंडेल या जगविख्यात आहेत. १९२० ते १९८० या काळात त्यांनी भरतनाट्यमच्या शिक्षणाचा मोठा प्रचार, प्रसार केला. अशा या रुक्मिणीदेवी या प्राणीप्रेमीही होत्या. घरामधील पाळीव प्राणी असो की मोकाट त्याबाबत त्याना मोठे ममत्व होते. म्हणूनच साठच्या दशकात प्राण्यांविषयी स्वतंत्र संस्था निर्माण करण्याचा आग्रह त्यांनी केला. देशाला स्वातंत्र्य मिळून काहीच वर्षे झाली होती. त्यावेळी देशासमोर अनेक प्रश्नांचे जंजाळ होते. अशाच काळात प्राण्यांबाबत आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे आणि त्यासाठी ठोस काही तरी करायला हवे, असे ठासून सांगणाऱ्या रुक्मिणीदेवी यांच्या मागणीची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यामुळेच १९६२ मध्ये केंद्र सरकारने प्राणी कल्याण मंडळाची स्थापना केली. विशेष म्हणजे, रुक्मिणीदेवी यांनी चेन्नईतील वाल्मिकी नगरमध्ये असलेली त्यांची उमारत मंडळाच्या कार्यालयासाठी दिली. प्राण्यांविषयी त्यांचे असलेले हे महत्व जाणून सरकारने रुक्मिणीदेवी यांनाच मंडळाचे अध्यक्ष केले. खास बाब म्हणजे १९८६ पर्यंत रुक्मिणीदेवी या मंडळाच्या अध्यक्ष राहिल्या.

मंडळ तर स्थापन झाले पण त्याच्यासमोर अनेकानेक आव्हाने होती. त्यावेळचे कायद्यांनुसार प्राण्यांचे संरक्षण आणि कल्याण करणे तसे फार सोपे नव्हते. या साऱ्या कार्यात लोकसहभाग महत्त्वाचा होता. रुक्मिणीदेवी यांनी त्याच्यावर भर दिला. मंडळ नक्की काय आहे, ते काय करू इच्छिते, आपल्या जवळ, परिसरात असलेल्या प्राण्यांची काळजी का घ्यायची या साऱ्याबाबत जनप्रबोधन घडवून आणणे हेच खरे तर मोठे आव्हान मंडळासमोर होते. ते पेलले तरच पुढील काम सुकर होणार होते. म्हणूनच नृत्याच्या क्षेत्रात दबदबा असतानाच प्राणीमात्रांच्या संरक्षणातही त्यांनी सक्रीयता ठेवली. नृत्याच्या विविध कार्यक्रमांवेळी त्या प्राण्यांविषयी बोलू लागल्या, आवाहन करू लागल्या. त्याचा मोठा परिणाम झाला. १९६०च्या प्राणी क्रूर प्रतिबंधक कायद्यान्वये मंडळाची स्थापना करण्यात आली. २८ सदस्य असलेल्या या मंडळाचे कामकाज सुरू झाले. दर तीन वर्षांनी नवे पदाधिकारी निवडण्याचा निकष लावण्यात आला. विविध सरकारी विभाग, लोकप्रतिनिधी, तज्ज्ञ या साऱ्यांना मंडळावर सामावून घेण्यात आले आहे. १९८६मध्ये रुक्मिणीदेवी यांचे देहावसान झाले. तोपर्यंत त्या मंडळाला मार्गदर्शन करीत होत्या. त्यामुळे देशाच्या प्राणी सुरक्षेत त्यांचे योगदान अतिशय मोलाचे आहे.

प्राणी कल्याणाासाठी देशपातळीवरील मंडळाबरोबरच प्रत्येक राज्यांचे स्वतंत्र आणि त्याखालोखाल प्रत्येक जिल्ह्यासाठीही मंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मंडळाची भूमिका आहे. आजवर ती प्रत्यक्षात आली नसली तरी येत्या काळात ते नक्की साकार होणार आहे. नैसर्गिक आपत्तीवेळी प्राण्यांच्या संरक्षणासाठी विशेष मदत उपलब्ध करुन देणे, प्राण्यांसाठी विविध उपचार साहित्य, पुनरुत्पादन नियंत्रण कार्यक्रम, भटक्या जनावरांसाठी निवारा हे काम मंडळ करीत आहे. प्राण्यांना विविध प्रकारच्या लसी देणे आवश्यक असते. त्यासाठी विशेष मोहिम राबविली जाते. मंडळाचे कार्य गेल्या काही वर्षात तर अधिकच विस्तारले आहे. प्राण्यांविषयी प्रेम असलेल्या आणि त्यांच्यासाठी काम करण्याची इच्छा असलेल्यांना मंडळाचे कार्य खुणावते आहे. त्याचा विचार नक्कीच करायला हवा.

२ शून्यातून विश्व

स्वयंसेवी उद्योजिका ते 'उद्योगवर्धिनी'

स्त्रिया नोकऱ्यांसाठी अर्ज करतील की, त्या आयुष्यभर चूल आणि मूल सांभाळत गृहिणी बनून राहतील किंवा अशिक्षित राहून दुसऱ्यांवर अवलंबून राहतील? तर यापैकी काहीही नाही! राज्यातील सोलापूर येथील 'उद्योगवर्धिनी'चे उदाहरणच द्यायचे झाले तर ही एक स्वयंसेवी संस्था आहे, जी महिलांना स्वयं साहाय्यता गटांद्वारे उद्योजक बनण्यासाठी मदत व प्रशिक्षण देते; तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगारदेखील उपलब्ध करून देते.चंद्रिका यांचा जन्म अहमदाबादमध्ये निरक्षर कुटुंबात झाला. विविध राष्ट्रवादी स्वयंसेवी संस्थांना आपले जीवन समर्पित करणाऱ्या शंभूसिंह चौहान यांच्याशी लग्न झाल्यानंतर, त्या अहमदाबादहून सोलापूरला स्थायिक झाल्या. चंद्रिका यांना त्यांच्या सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांकडून 'भाभीजी' म्हणून ओळखले जाते. पतीच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना कुटुंबाचा उदरनिर्वाह स्वतःच करावा लागला. अनेक वर्षे त्यांनी 'ग्राहक मंच' आणि 'लोक कल्याण समिती'त काम केले. यासह त्यांनी शेजारच्या महिलांच्या मदतीने हळूहळू टेलरिंग आणि कॅटरिंगचे कंत्राट घेण्यास सुरुवात केली. यामुळे चंद्रिका यांना केवळ उद्योजक बनण्यास मदत झाली नाही, तर कमी उत्पन्न असलेल्या महिलांना त्यांच्या दैनंदिन घरगुती जीवनात कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो, याची जाणीवही त्यांना झाली.कालांतराने त्यांनी महिलांचे एक मोठे जाळे उभे केले आणि महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून उद्योजक म्हणून घडविण्यासही मदत केली. चंद्रिका यांनी तयार केलेल्या या महिलांच्या संपर्कजाळयाचा पुढे त्यांना राजकारणात प्रवेश करतानाही फायदा झाला. चंद्रिका नगरसेविका म्हणूनदेखील निवडून आल्या आणि दोन कार्यकाळ सोलापूर महापालिकेत त्यांनी कामही केले. २००६ साली त्यांनी 'उद्योगवर्धिनी' ही स्वयंसेवी संस्था सुरू करून, त्यांच्या कार्याला औपचारिक रूप दिले. प्रारंभी या स्वयंसेवी संस्थेचा उद्देश ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचा होता.केटरिंग व्यवसाय हा देखील त्यांच्या या कार्याचा एक महत्त्वाचा भाग.ज्वारीची भाकरी आणि शेंगदाण्याची चटणी हे नाव ऐकताच तोंडाला पाणी सुटते. 'उद्योगवर्धिनी'ने ग्रामीण भागातील या सामान्य माणसाच्या जेवणाला चक्क एक लोकप्रिय 'ब्रॅण्ड'चे स्वरुप दिले. तसेच वृद्धाश्रम आणि रुग्णांच्या कुटुंबीयांना अवघ्या दीड रुपयांत पौष्टिक आहार पुरवला. 'उद्योगवर्धिनी' संस्था तिच्या पौष्टिक आहारासाठी म्हणूनच सुप्रसिद्ध आहे.

चंद्रिका यांच्या नेतृत्वाखाली 'उद्योगवर्धिनी'ने त्यांच्या कार्याचा झपाट्याने विस्तार केला, त्यात टेलरिंग, कॉटन हॅण्डबॅग, फाईल्स, पर्स, शॉपिंग बॅग बनविण्यासह ब्युटीशियनचा कोर्स चालवत आहे. यात महिलांना व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करण्यामध्ये प्रौढ महिलांसाठी साक्षरता शिबीर चालवणे आणि महिलांना स्वावलंबी होण्यासाठी दुचाकीचे प्रशिक्षण देणे याबाबी देखील समाविष्ट आहेत. तसेच ज्या महिला उद्योजक बनू शकतात, त्यांना कच्चा माल खरेदी करणे, उत्पादनाचे मार्केटिंग करणे, बिलिंग करणे, ऑर्डर घेणे, तयार वस्तूंचा पुरवठा योग्य पद्धतीने करणे आणि अगदी टॅक्स रिटर्न भरणे यांसारख्या व्यवसायाशी निगडित विविध पैलूंचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच वृद्धाश्रमाच्या माध्यमातून वृद्ध आणि गरजूंना मदत करणे आणि निराधारांना अन्न पुरवणे, हादेखील चंद्रिका यांच्या सामाजिक उपक्रमांचा एक भाग आहे.समाजाप्रति संवेदनशीलता हाच या संस्थेचा पाया. अशा या समाजात उद्योजिकांना घडविणाऱ्या चंद्रिका चौहान यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

३ शब्दार्थ

उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपत आल्यानंतर मुलांना आणि त्यांच्या पालकांनाही शाळेची चाहूल लागते. मुलं जर लहान असतील तर त्यांना सवय लागावी म्हणून शाळेत पाठवलं जातं. लहान मुलांच्या शाळेबद्दल चर्चा चालू झाली की सर्वात प्रथम , क्लासेसचे नाव समोर येते. पण कधी विचार केला आहे का आणि या शब्दांचा नेमका अर्थ काय आहे? चे पूर्ण रूप लोअर किंडरगार्डन आहे. प्ले ग्रुप आणि नर्सरी नंतरचा हा पुढचा वर्ग आहे. इथपर्यंत पोहोचल्यानंतरही मुलं विशेष अभ्यास करत नाहीत, तर अगदी प्राथमिक गोष्टी शिकतात. या वर्गात प्रामुख्याने जसे चित्र ओळखणे, रेषा काढणे, रेखाचित्रे काढणे, कविता पाठ करणे इत्यादी



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क –९८३३१४६३५६
इमेल –
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक सूर्योदय

गुरूवार १२ फेब्रुवारी २०२६



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## देवरुख येथील प्रा. मंजुश्री भागवत लेख स्पर्धेत प्रथम

देवरुख प्रतिनिधी ११:- रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाने ख्यातनाम चरित्रकार पद्मभूषण डॉ. धनंजय कीर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित केलेल्या खुल्या गटातील लेख स्पर्धेत देवरुखच्या मंजुश्री संजय भागवत




यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्यांच्या लेखाचा विषय चरित्र,चारित्र्य आणि राष्ट्रनिर्माण असा होता.ङ्ग महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, कोकण विभाग ग्रंथालय संघ आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त वार्षिक अधिवेशनात रत्नागिरी येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. प्रा. मंजुश्री भागवत यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# राष्ट्रगीतापूर्वी आता पूर्ण वंदे मातरम्? अनिवार्य, केंद्र सरकारचा मोठा निर्णय

नवी दिल्ली: वंदे मातरम्? ला ७ नोव्हेंबर २०२५ मध्ये १५० वर्ष पर्ण झाली. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक अधिकृत कार्यक्रमांमध्ये राष्ट्रगीतापूर्वी वंदे मातरम्? चं सादरीकरण बंधमकारक आहे.ङ्ग केंद्र सरकारने आता प्रत्येक अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम्? च्या संपूर्ण सहा कडव्यांचं गायन किंवा वादन अनिवार्य केलं आहे.

आता जन गण मन या ५२ सेकंदांच्या राष्ट्रगीतासह आता ३ मिनिटं १० सेकंदांचं वंदे मातरम्? सादर करणंही अनिवार्य आहे. याबद्दल गृह मंत्रालयाने १० पानांचा सविस्तर आदेश जाहीर करून हे सर्व नियम स्पष्ट केले.ङ्ग या नियमावलीत काही महत्त्वाचे नियम जारी केले आहेत. वंदे मातारम्? चे सर्व सहा कडवे कोणत्याही सरकारी कार्यक्रमावेळे गाणे किंवा वाजवणे अनिवर्य आहे. तसेच हे गीत ३ मिनिटे १० सेकंदांचं असेल. शिवाय सर्व नागरिकांना राष्ट्रगीताप्रमाणेच यादरम्यानसुद्धा सावधान स्थितीत उभं राहणं गरजेचं आहे. प्रत्येक अधिकृत कार्यक्रमाची वंदे मातारम्? ने सुरुवात होईल, त्यानंतर राष्ट्रगीत जन गण मन आणि मग कार्यक्रम सुरू होणार.




## शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी इम्रान पानसरे यांची निवड

सहसंपादक-: नारायण म्हात्रे

नागोठणे येथे शिवसेना कार्यालयात सालाबादप्रमाणे शुक्रवार ६ मार्च रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे त्यानिमित्ताने मंगळवार १० फेब्रुवारी रोजी शिवसेना शाखा नागोठणे येथे मिटींगचे आयोजन करण्यात आले होते, या मिटींगमध्ये नविन कार्यकारिणी निवडण्यात आली. तसेच यावर्षीची शिवजयंती भरगच्च कार्यक्रमासह शिव छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार घराघरात रुजवण्यासाठी साजरी होणार आहे त्या निमित्ताने आयोजित केलेल्या मिटींगमध्ये शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते इम्रान पानसरे यांची निवड करण्यात आली तर कार्याध्यक्षपदी मुकेश भोय व विलास गोरे यांची नियुक्ती करण्यात आली तर उपाध्यक्ष संजय पाटील, अजित दळवी, सचिव श्रीराम



मांगले, सहसचिव अविनाश भोसले, खजिनदार संदीप राऊत, सहखजिनदार बाळू रटाटे, सल्लागार किर्ती कुमार कळस, जितेंद्र कजबजे, सुहेल पानसरे, मनोज कोळी सदस्य सचिन रोडेकर, संतोष घोसाळकर, नागेश सुर्वे, मंगेश वाघमारे, प्रसाद कोळी, सलिम अख्तार, प्रविण चितळे, दिनेश वादळ, संदिप शिर्के, रुपेश जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या नवनिर्वाचित कार्यकारिणीचे शिवसेना शाखा नागोठणे यांच्या वतीने शाखाप्रमुख राजेश सुर्वे, उपशाखाप्रमुख पंकज कामथे, संपर्कप्रमुख मुकेश भोय, शहर संघटक बाळू रटाटे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## लक्ष्मी पब्लिक स्कुल मधे वार्षिक स्नेह समेंलन मोठ्या उत्साहात साजरा

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुबंई एल.ए.पाटील एज्युकेशनचे लक्ष्मी पब्लिक स्कुल ॲन्ड ज्युनियर कॉलेज हे सुकापुर-मालेवाडी या ठिकाणी सन २०२१ पांसुन कार्यतर आहे. मराठी व ईग्रंजी या दोन्ही भाषा शिकविल्या जातात.अश्या शाळां किंवा महाविद्यालया मधुन वर्षातुन एकदा वार्षिक स्नेहसमेंलनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो.या मधे विद्यार्थी नुर्त्य,नाटक,गायन द्वारे आपल्या कलागुंणाचे प्रर्दशन करतात.अश्या वेळी शिक्षक व विद्यार्थी एकत्र येवुन हे सेलिब्रेशन साजरे करतात.ज्यामुळे शाळा




अथवा कॉलेजच्या संस्कृतीची जडणघडण होते.तर विद्यार्थ्यांच्या वर्षभराच्या कष्टाचे फळ आणि त्यांच्यातील सुप्तगुणांना वाव देणारा एक मोठा सोहळा असतो.अश्याच एका नुर्त्य कार्यक्रमा मधे २ रा क्रमांक कुमारी शुभश्री विनोद दिवेकर व छोट्या मुलांमधे अव्वल क्रमांक श्रीमांश दिवेकर या मुलानी पटकावला या कार्यक्रमाला उपस्थित असणा-या सर्व विद्यार्थी मुलां-मुलांना त्यांचे कौतुक करुन बक्षिसे देण्यांत आली.या वार्षिक स्नेहसमेंलनाच्या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष महेश पाटील,मुख्य जनसपंर्क अधिकारी प्रशांत बाळु गांगर्डे ,पनवेल महानगर पालिकेचे नवनिर्विचीत नगरसेवक,भारतीय जनता पार्टीचे पनवेल शहर अध्यक्ष आणि मोठ्या संख्येंने पालकवर्ग उपस्थित होता.

## सुयश कॉम्प्युटर सेंटर आबलोली यांच्यावतीने पडवे जि.प.आणि पं.स. नवनिर्वाचित उमेदवारांचे जल्लोषात स्वागत

आबलोली (संदेश कदम) गुहागर तालुक्यातील पडवे जिल्हा परिषद गटातील विजय








उमेदवार महेश नाटेकर तसेच पडवे पंचायत समिती गणातील विजयी उमेदवार निलेश सुर्वे आणि पाचेरी सडा पंचायत समिती गणातून विजयी उमेदवार सुचिता घाणेकर या तिन्ही विजयी उमेदवारांचा गुहागर तालुक्यातील आबलोली येथील सुयश कॉम्पुटर सेंटर आबलोली यांच्यावतीने विजयी ङ्गउमेदवारांचा शाल घालून , पुष्पगुच्छ देऊन आणि पेढे भरवून पुढील वाटचालीस मंगलमय शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उमेदवार यांच्यासोबत सागर काजरोळकर, विजय वैद्य, राजू कारेकर, प्रदीप सुर्वे, विशाल गोताड, शरद पावरी आदी .कार्यकर्ते उपस्थित होते.

## रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचा निर्णय गुलदस्त्यात; मात्र पालकमंत्रीपदाचा पेच सुटणार?

सहसंपादक-:

नारायण म्हात्रे

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा निकाल नुकताच लागला असून यामध्ये शिवसेना (शिंदे) गटाने आपले वर्चस्व राखत २१ जागा पटकावल्या आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस १६, भारतीय जनता पार्टी १५ जागा जिंकल्या आहेत, तसे पाहता राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा यांच्यामध्ये सत्तेचे गणित जुळत असून दोघांची बेरीज ३१ होत असून शिवसेना शिंदे गटाला दूर ठेवण्यासाठी काही नेते मंडळी उत्सुक असून तसे जर झाले तर शिवसेना (शिंदे) गट विरोधी बाकावर बसेल, पण विधानसभेच्या निवडणुका होवून आज जवळपास दीड वर्ष उलटले असून पालकमंत्रीपदासाठी शिंदे गटाकडून भरत गोगावले हे पालकमंत्रीपदासाठी वारंवार दावा करत असल्याने त्यांनाही जास्त काळ दूर ठेवता येणार नाही व वाद लवकरच मिटणार असून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गट हा जिल्ह्यात एक नंबरचा पक्ष असल्याचे सिद्ध झाले आहे. शिवसेनेचे तीन आमदार सत्तास्थानी असून त्यांना दुखावून जमणार नसल्याचे हा तिढा सुटला तर शिवसेनेला जिल्ह्याचे पालकमंत्रीपद देऊन खूष केले जाईल व जिल्हा परिषद शिवतीर्थावर राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप युतीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष बसवून शिवसेनेची एखाद्या सभापतीपदावर वर्णी लागू शकते तसेच भाजपचे जिल्ह्यात तीन आमदार प्रशांत ठाकूर (पनवेल), रविंद्र पाटील (पेण), महेश बालदी (उरण) हे अनुभवी असताना त्यांची भूमिका गुलदस्त्यात आहे व त्यांनी आतापर्यंत पालकमंत्री पदावर कोणताही दावा केलेला नाही. कारण जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भाजपाला मिळवायचे होते पण अनुभवी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निलिमा पाटील व माजी अर्थ व बांधकाम सभापती चित्रा पाटील यांच्या रुपाने भाजपाचा झालेला पराभव यामध्ये त्यांनी अध्यक्षपद गमावले असल्याचे बोलले जात आहे, या संपूर्ण गणिताची बेरीज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुनील तटकरे, राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांना लक्ष घालून पुढचे गणित सोडवावे लागेल असे जाणकारांकडून बोलले जात आहे.




भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )